# मराठी भाषा आणि साहित्य विभाग

## वार्षिक अहवाल २०२१-२२

इस्माईल युसूफ महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ह्या वर्षात अनेक अभ्यासपूरक उपक्रम आभासी पध्दतीने राबविण्यात आले. मराठी वाङ्मय मंडळ दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करीत असते. मराठी वाङ्मय मंडळातर्फे, दिनांक १४/०१/२०२२ ते २८/०१/२०२२ ह्या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' तसेच दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी 'मराठी भाषा गौरव दिन ' आभासी पध्दतीने साजरा करण्यात आला.

- **मराठी हस्ताक्षर स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन शुक्रवार, दिनांक २१/०१/२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजता दूरदृश्यप्रणालीद्वारे करण्यात आले होते.

- **मराठी निबंधलेखन स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन शनिवार, दिनांक २२/०१/२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजता दूरदृश्यप्रणालीद्वारे करण्यात आले होते. प्रस्तुत निबंध स्पर्धेत मराठी भाषेसंदर्भातील विविध विषयांवरील निबंध विद्यार्थ्यांनी लिहिले .

- **ग्रंथपरीक्षण स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन रविवार, दिनांक २३/०१/२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजता दूरदृश्यप्रणालीद्वारे करण्यात आले होते.

- **काव्य रसग्रहण स्पर्धा** :

मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्य रसग्रहण स्पर्धेचे आयोजन सोमवार, दिनांक २४/०१/२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजता दूरदृश्यप्रणालीद्वारे करण्यात आले होते.

➢ **सर्जनशील लेखन स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सर्जनशील लेखन स्पर्धेचे आयोजन मंगळवार, दिनांक २५/०१/२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet ह्या माध्यमांद्वारे करण्यात आले होते.

➢ **प्रश्नमंजुषा स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन बुधवार, दिनांक २६/०१/२०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजता Google Meet आणि Google Form द्वारे करण्यात आले होते.

➢ **काव्यवाचन**:

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन उपक्रमाचे आयोजन गुरुवार, दिनांक २७/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता Google Meet ह्या आभासी माध्यमाद्वारे करण्यात आले होते. प्रस्तुत काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेतील विविध विषयांवरील कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या.

➢ **ग्रंथ अभिवाचन स्पर्धा** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ अभिवाचन स्पर्धेचे आयोजन सोमवार, दिनांक ३१/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता Google Meet ह्या आभासी माध्यमाद्वारे करण्यात आले होते. प्रस्तुत ग्रंथ अभिवाचन स्पर्धेत कॉ. गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे वाचन विद्यार्थ्यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित सर्व स्पर्धा आणि उपक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद नोंदवला.

➢ **मराठी विभाग (कनिष्ठ महाविद्यालय)** :

महाविद्यालयात कनिष्ठ विभागातील शिक्षिका प्रा.लाजवंती चव्हाण ह्यांच्या पुढाकाराने कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध प्रसंगांच्या अनुषंगाने पारिभाषिक शब्द स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, भाषांतर स्पर्धा, भेटकार्ड स्पर्धा, निबंध स्पर्धा, पत्रलेखन स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विभागात विद्यार्थ्यांसाठी जागतिक भाषांतर दिन, महात्मा


गांधी जयंती, जागतिक टपाल दिन, शिक्षक दिन, वाचन प्रेरणा दिन, दिवाळी, नववर्ष आदी दिवस दूरदृश्यप्रणालीद्वारे साजरे करण्यात आले.


- **मराठी भाषा गौरव दिन :**

मराठी विभागातर्फे रविवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन आभासी पध्दतीने करण्यात आले होते . ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा.प्रमोद शंकर पवार,(प्रमुख समन्वयक (मराठी), मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्रे विभाग,यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक) ह्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.होमी भाभा स्टेट विद्यापीठाच्या कुलगुरू आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.स्वाती वाव्हळ ह्यांनी भूषविले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन आणि कवी कुसुमाग्रज ह्यांच्याबद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.प्रमुख वक्त्यांनी 'तंत्रस्नेही मराठी भाषा' या विषयावर व्याख्यान दिले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकांची घोषणा करण्यात आली. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहा.प्रा.समीर वैरागी ह्यांनी केले. ह्या कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती वंदना, कुसुमाग्रजांवरील महितीपटाचे सादरीकरण करण्यात आले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी 'मराठी अभिमान गीता'चे गायन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांची आवर्जून दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी विभागातील विद्यार्थ्यांचे साहाय्य लाभले.

**सहा.प्रा. समीर रामचंद्र वैरागी**
**मराठी विभाग प्रमुख**

**मराठी भाषा गौरव दिनाची क्षणचित्रे**






## मराठी विभागातील शिक्षकांची आणि माजी विद्यार्थ्यांची वैयक्तिक उपलब्धी (शै. वर्ष २०२१-२१)


- **सहा.प्रा. समीर रामचंद्र वैरागी** –
  १. विद्यापीठ अनुदान आयोग आणि मानव संसाधन केंद्र(UGC-HRDC), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ह्यांचा मराठी विषयातील ‘साहित्यातील संस्कारमूल्ये आणि समाजाची जडणघडण’ हा उजाळा वर्ग ‘अ’ श्रेणी प्राप्त करून यशस्वीरित्या पूर्ण केला. (कालावधी-०६/१२/२०२१ ते १८/१२/२०२१)
  २. एस.चंद्रा महिला महाविद्यालय, सडक अर्जुनी, गोंदिया येथे ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ निमित्त ‘प्रादेशिक बोली भाषांचे संवर्धन’ ह्या विषयावर २८ जानेवारी २०२२ रोजी दूरदृश्यप्रणालीद्वारे व्याख्यान दिले.
  ३. ‘अनुवादाचे तंत्र’, ‘परदेशी भाषांतील साहित्याचे मराठी भाषांतर’ इत्यादी ई-परिसंवादांमध्ये तसेच आंतरमहाविद्यालयीन अनुवाद कार्यशाळेत दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग.
- कु. पूजा वाघमोडे, कु.निलेश खताते ह्या विद्यार्थ्यांचा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात मराठी विषयात ‘विद्या निष्णात’ (एम.ए.) ह्या पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश.
- मराठी विभागाचा माजी विद्यार्थी ‘कु.प्रशांत लेमाडे’ अर्थशास्त्र विषयात राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) आणि राज्य पात्रता परीक्षा (सेट) ह्या परीक्षा उत्तीर्ण.

**म रा ठी**

**मराठी भाषेची प्रशस्ति**

जैसी हरळामाजी रत्नकिळा।
कीं रत्नामाजी हिरा निळा।
तैसी भाषांमाजी चोखळा।
**भाषा मराठी**।।१।।
जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी।
कीं परिमळांमाजि कस्तुरी।
तैसी भाषांमाजी साजिरी।
**मराठियां**।।२।।
पखियांमधें मयोरु।
रुखियांमधे कल्पतरु।
भाषांमधें मानु थोरू।
**मराठियेसी**।।३।।
तारांमधे बारा राशी।
सप्तवारांमाजी रवि-शशी।
या दीपिचेयी भाषांमधे तैसी।
**बोली मराठीया**।।४।।

- **ख्रिस्तदास थॉमस स्टीफन्स**



**‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ अंतर्गत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे निकाल**

**(१४ जानेवारी २०२२ ते २८ जानेवारी २०२२)**

## वरिष्ठ महाविद्यालय विभाग

**१. मराठी हस्ताक्षर स्पर्धा** (दिनांक: २१ जानेवारी २०२२)

कु. संपदा हेमंत नार्वेकर – प्रथम वर्ष कला

**२. मराठी निबंधलेखन स्पर्धा** (दिनांक: २२ जानेवारी २०२२)

कु. वैष्णवी अभय लाड – प्रथम वर्ष कला

**३. ग्रंथपरीक्षण स्पर्धा** (दिनांक: २३ जानेवारी २०२२)

कु. सुषमा दिलीप दाखले – द्वितीय वर्ष कला

**४. कविता रसग्रहण स्पर्धा** (दिनांक: २४ जानेवारी २०२२)

कु. सुषमा दिलीप दाखले – द्वितीय वर्ष कला

**५. सर्जनशील लेखन स्पर्धा** (दिनांक: २५ जानेवारी २०२२)

कु. करीना भालचंद्र अडबल – प्रथम वर्ष कला

**६. प्रश्नमंजुषा स्पर्धा** (दिनांक: २६ जानेवारी २०२२)

कु. विजय भरत खाडे – प्रथम वर्ष कला

**७. काव्यवाचन स्पर्धा** (दिनांक: २७ जानेवारी २०२२)


कु. करीना भालचंद्र अडबल – प्रथम वर्ष कला


**८. ग्रंथ अभिवाचन स्पर्धा** (दिनांक: ३१ जानेवारी २०२२)


कु. करीना भालचंद्र अडबल – प्रथम वर्ष कला

- **तृतीय वर्ष कला (मराठी) विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी ( शैक्षणिक वर्ष २०२०-२१ )**

- **प्रथम क्रमांक** – कु. प्रज्ञा रमेश जांभळे
- **द्वितीय क्रमांक** - कु. किरण निरंजन वर्तक
- **तृतीय क्रमांक** - कु. पूजा सीताराम गुरव



## कनिष्ठ महाविद्यालय विभाग

१. **मराठी हस्ताक्षर स्पर्धा** (दिनांक: २१ जानेवारी २०२२)

कु. स्नेहा महादेव सक्कर्गी – इयत्ता अकरावी (शास्त्र)

२. **मराठी निबंधलेखन स्पर्धा** (दिनांक: २२ जानेवारी २०२२)

कु. स्वरूप सुमित इंगळे – इयत्ता अकरावी (शास्त्र)

३. **ग्रंथपरीक्षण स्पर्धा** (दिनांक: २३ जानेवारी २०२२)

कु. स्वरूप सुमित इंगळे – इयत्ता अकरावी (शास्त्र)

४. **कविता रसग्रहण स्पर्धा** (दिनांक: २४ जानेवारी २०२२)

कु. स्वरूप सुमित इंगळे – इयत्ता अकरावी (शास्त्र)

५. **सर्जनशील लेखन स्पर्धा** (दिनांक: २५ जानेवारी २०२२)

कु. वैष्णवी जयेश शिर्के – इयत्ता बारावी (वाणिज्य)

६. **प्रश्नमंजुषा स्पर्धा** (दिनांक: २६ जानेवारी २०२२)

कु. श्रावणी संदीप बेलोसे – इयत्ता अकरावी (शास्त्र)

७. **काव्यवाचन स्पर्धा** (दिनांक: २७ जानेवारी २०२२)


प्रथम क्रमांक – कु. स्वरूप सुमित इंगळे – इयत्ता अकरावी (शास्त्र)


द्वितीय क्रमांक - कु. वैष्णवी जयेश शिर्के – इयत्ता बारावी (वाणिज्य)


८. **ग्रंथ अभिवाचन स्पर्धा** (दिनांक: ३१ जानेवारी २०२२)

प्रथम क्रमांक – कु. मंगेश शेषराव निरडे – इयत्ता अकरावी (वाणिज्य)

द्वितीय क्रमांक - कु. वैष्णवी जयेश शिर्के – इयत्ता बारावी (वाणिज्य)




**।।मराठी असे आमुची मायबोली।।**

## मराठी कनिष्ठ महाविद्यालय विभागात आयोजित विविध स्पर्धांचे निकाल (शै,व.२१-२२)

१. जागतिक भाषांतर दिन (दिनांक: ३० सप्टेंबर २०२१)

- **पारिभाषिक शब्द स्पर्धा**

  प्रथम क्रमांक - कु. मानसी मिलिंद महाडिक – इयत्ता बारावी (वाणिज्य)

  द्वितीय क्रमांक -कु. प्रियांका अरुण सपताळ – इयत्ता बारावी (शास्त्र)

- **म्हणी भाषांतर स्पर्धा**

  प्रथम क्रमांक - कु. नंदन बागम – इयत्ता बारावी (वाणिज्य)

२. महात्मा गांधी जयंती (दिनांक: ०२ ऑक्टोबर २०२१)

- **निबंधलेखन स्पर्धा**

  प्रथम क्रमांक – कु. वैष्णवी जयेश शिर्के – इयत्ता बारावी (वाणिज्य)

  द्वितीय क्रमांक - कु. मानसी मिलिंद महाडिक – इयत्ता बारावी (वाणिज्य)

३. जागतिक टपाल दिन (दिनांक: ०९ ऑक्टोबर २०२१)

- **पत्रलेखन स्पर्धा**

  प्रथम क्रमांक – कु. उत्तम चंद्रकांत मटकर– इयत्ता बारावी (वाणिज्य)

४. वाचन प्रेरणा दिन (दिनांक: १५ ऑक्टोबर २०२१)

- **निबंधलेखन स्पर्धा**

  प्रथम क्रमांक -कु. प्रियांका अरुण सपताळ – इयत्ता बारावी (शास्त्र)

  द्वितीय क्रमांक -कु. दिपाली संतोष सुगदरे – इयत्ता बारावी (शास्त्र)

  तृतीय क्रमांक - कु. वैष्णवी महेश्वर मेस्त्री – इयत्ता बारावी (वाणिज्य)

५. दीपावली (दिनांक: ०४ नोव्हेबर २०२१)

- **भेटकार्ड बनविणे स्पर्धा**

  प्रथम क्रमांक -कु. प्रियांका अरुण सपताळ – इयत्ता बारावी (शास्त्र)

  द्वितीय क्रमांक -कु. दक्ष मंगेश कोकलेकर – इयत्ता बारावी (कला)

  तृतीय क्रमांक -कु. युथिका सुनील सक्रु – इयत्ता अकरावी (वाणिज्य)

  उत्तेजनार्थ -कु. संजना चौबे – इयत्ता अकरावी (वाणिज्य)

६. नववर्ष (दिनांक: २४ डिसेंबर २०२१)

- **निबंध/काव्यलेखन स्पर्धा**

  प्रथम क्रमांक -कु. ओम खांडेकर – इयत्ता अकरावी (वाणिज्य)

  द्वितीय क्रमांक - कु. स्नेहा महादेव सक्कर्गी – इयत्ता अकरावी (शास्त्र)

  तृतीय क्रमांक - कु. हर्षाली राज पनियार– इयत्ता अकरावी (कला)

  उत्तेजनार्थ - कु. गायत्री प्रदीप गवस – इयत्ता अकरावी (शास्त्र)

  **वरिष्ठ विभाग** - प्रथम क्रमांक - कु. करीना भालचंद्र अडबल – प्रथम वर्ष कला